# श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,

# पंढरपूर

# विधी व न्याय विभाग



## ई– लिलाव सुचना क्रं. ९

श्री विठ्ठल रूक्मिणी भक्त निवास, सर्व्हे नं. ५९ मधील सी विंग दुकान गाळे व एफ विंग (व्यवसायीक इमारत) दुकान गाळे / ऑफिसेस

सुरक्षा ठेव किमान बोली रक्कम :– परिशिष्ठ "अ" प्रमाणे
अनामत (E MD) :– १०,०००/– रूपये

सन २०२० – २०२१

लिपीक  भ.वि.प्र.  लेखा अधिकारी  व्यवस्थापक  कार्यकारी अधिकारी

**कार्यकारी अधिकारी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**
**यांचे कार्यालय जिल्हा सोलापूर - ४१३३०४**
**(महाराष्ट्र शासन स्थापित)**

**दुरध्वनी क्र. ०२१८६-२२४४६६/२२३५५०** **ई मेल : eotemple@gmail.com**

पत्र जा.क्र./श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास/का.वि. /२०२० दिनांक: /१२/२०२०

## ई– लिलाव सुचना क्रं. ९ सन २०२०

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर, ता. पंढरपूर यांच्या मालकीचे, श्री विठ्ठल रूक्मिणी भक्त निवास, सर्व्हे नं. ५९ मधील सी विंग दुकान गाळे व एफ विंग (व्यवसायीक इमारत) दुकान गाळे/ऑफिस भोगवट्याने देण्याबाबतचा ई – जाहिर लिलावाचे आयोजन केलेले आहे. खालील नमुद दुकान गाळे/ऑफिस ३३ महिने करीता भाड्याने द्यावयाचे आहेत. त्याकरीता पात्र ई–लिलाव बोली धारकांकडुन लिलाव बोली सुरक्षा ठेवीवर मागविण्यात येत आहेत.

**नमुना तक्ता** **(परिशिष्ठ “अ” प्रमाणे )**

| अ.क्रं. | गाळा क्रमांक | साईज (मीटर) | क्षेत्रफळ (चौ.मीटर) | दरमहा भाडे | सुरक्षा ठेव किमान बोली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

### –: अटी – शर्ती :–

1. संपूर्ण प्रक्रिया ई–जाहिर लिलावाद्वारे करावयाची आहे. लिलावाबाबतच्या अटी–शर्ती व पुढील तपशिलासाठी कृपया शासनाच्या https://maharashtra.nextprocure.in या संकेतस्थळावर दि. २५/१२/२०२० पासुन भेट द्यावी. तसेच लिलाव वेळापत्रक नमुद संकेतस्थळावर पहावयास मिळेल.
2. सदर लिलावाकरीता लिलाव बोली फी, १०००/– व लिलाव अनामत रक्कम रू १०,०००/– चा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी.(कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर) यांचे नावे किंवा रोख स्वरुपात व ओळखपत्र, रहिवासी पुरावा, पॅन कार्ड आणि दस्तवेजाच्या स्वाक्षांकीत प्रति लखोट्यात दि.२५/१२/२०२० पासुन दि. १६/०१/२०२१ सायं. ६.०० वाजेपर्यंत कार्यालयीन

लिपीक भ.वि.प्र. लेखा अधिकारी व्यवस्थापक कार्यकारी अधिकारी

वेळेत मंदिरे समिती कार्यालयात जमा करावी. तसेच ऑनलाईन रजिस्ट्रेशन फी https://organizations.maharashtra.nextprocure.in या संकेतस्थळावर ऑनलाईन सबमिशन करता येईल. तसेच दि.१८/०१/२०२१ सकाळी ११.०० वाजलेपासुन दुपारी ३.०० वाजेपर्यंत पात्र लिलावधारकांची ऑनलाईन सुरक्षा ठेव रक्कमेची लिलावाची बोली अपलोड करता येईल.

3. ई–जाहिर लिलावात सहभागी होणे करीता पात्र लिलावधारकाने त्याच्या पात्र प्रवर्गातील नोंदणी संबंधीचे सर्व कागदपत्रे PDF स्वरूपात तसेच सर्व्हीस प्रोव्हायडर फी रु. ११८०/– ऑनलाईन स्वरूपात भरावी. लिलाव बोली भरणा संबंधीचे दस्तऐवज (लिलाव बोली फी/अनामत रक्कम) स्कॅन करुन ई–जाहिर लिलाव बोली सोबत सादर करणे बंधनकारक राहील.
4. ज्या लिलावधारकांना एक पेक्षा जास्त दुकानांकरीता लिलावात सहभागी व्हावयाचे असेल. त्यांनी प्रत्येक दुकानाकरीता स्वतंत्रपणे लिलाव बोली फी, लिलाव बोली अनामत व ऑनलाईन रजिस्ट्रेशन फी भरणा करणे बंधनकारक राहील.
5. लिलावधारकाने ऑनलाईन सुरक्षा ठेव लिलाव बोली बोलतांना किमान रक्कम रु.१०,०००/– च्या पटीत सुरक्षा ठेव लिलाव बोली अपलोड करावी.
6. ई–निविदामध्ये ठरविण्यात आलेल्या मुलभुत दरापेक्षा कमी दराच्या निविदा देकार प्राप्त झाल्यास त्याचा विचार केला जाणार नाही व त्यासाठी पुन्हा ई–निविदा मागवण्यात येतील.
7. दुकान गाळे/ऑफिस मंजुर लिलाव धारकांस परिशिष्ठ "अ" प्रमाणे म्हणजे मंदिरे समितीने प्रत्येक दुकान गाळे/ऑफिसला अधिकृत क्रमांक दिले आहेत त्याप्रमाणे गाळा भाडे व मंजुर बोली प्रमाणे सुरक्षा ठेव भरावी लागेल. सुरक्षा ठेवीवर मंदिरे समिती कडून कोणतेही व्याज मिळणार नाही.
8. ज्यांची दुकान गाळे/ऑफिस चे सुरक्षा ठेव लिलाव बोली मंजुर होईल त्या लिलावधारकांनी सुरक्षा ठेव १ महिन्याच्या आत श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर कार्यालयात भरणा करणे बंधनकारक राहील. रकमेचा भरणा मुदतीत न झाल्यास लिलाव बोली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व दुकानाचा ताबा मिळणार नाही.
9. **दुकान गाळे/ऑफिस चे मासिक भाडे दर हे नगरपालिका कराव्यतिरिक्त आहे. नगरपालिका कर तसेच सेवा कर व इतर अन्य कर (जी.एस.टी.,सरकारी,वीज,पाणी) वगरै असतील ते लिलावधारकाने स्वतंत्रपणे मंदिरे समिती कडे जमा करावयाचे आहे.**

लिपीक | भ.वि.प्र. | लेखा अधिकारी | व्यवस्थापक | कार्यकारी अधिकारी

10. दुकान गाळे/ऑफिसमध्ये लागणारे वीज कनेक्शन देण्यात आले आहे. त्या व्यतिरीक्त इतर साहित्याचे स्वखर्चाने जोडणी/दुरूस्ती करणेचे आहे. तसेच दरमहा वीजेची देयके स्वतः लिलाव धारकाने जमा करावयाची आहेत.

11. सुरक्षा ठेव मान्य लिलाव धारकांस दुकानाचा ताबा घेण्यापुर्वी तिमाही भाडे "परिशिष्ठ अ" नुसार व त्या नुसार होणा-या एकत्रीत मालमत्ता कराची रक्कम समिती कार्यालयात भरणा करणे आवश्यक राहील. तसेच लिलाव कालावधीत अगाऊ तिमाही भाडे समितीकडे जमा करावयाचे आहे.

12. श्री विठ्ठल रूक्मिणी भक्त निवास संकुलातील सर्व दुकान गाळ्यांचा/ऑफिस यांचा लिलाव कालावधी ३३ महीने असेल. त्यानंतर दुकान गाळ्यांचा/ऑफिस समितीच्या ताब्यात देणे बंधनकारक राहील.

13. श्री विठ्ठल रूक्मिणी भक्त निवास संकुलातील सर्व दुकान गाळ्यांचा/ऑफिसे/हॉल लिलाव पहील्या ११ महिन्या करीता मंजुर दराप्रमाणे व तदनंतरील ११ महिने करीता ०५% प्रमाणे व शेवटचे ११ महिन्या करीता १०% (Compounding) असे ३३ महिने करीता आपोआप भाडेवाढ करण्यात येईल.

14. एखाद्या यशस्वी झालेल्या निविदाकाराने विहीत कालावधीत म्हणजे १ महिन्याचे आत सुरक्षा रक्कम व करारपत्र वेळेत न केल्यास त्यांची आनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल व त्यांना या पुढील निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. आशा वेळी मात्र निविदा प्रक्रियेत केवळ या दुकान गाळ्यांच्या/ऑफिसेस / हॉल साठी सहभागी झालेल्या सर्व पात्र निविदाकारांना पुन्हा Bidding लिलावाच्या बोलीसाठी संधी देण्यात येईल. या प्रक्रियेत नव्याने कोणालाही भाग घेता येणार नाही.

15. यशस्वी दुकान गाळे/ऑफिसलिलाव मंजुरी नंतर समितीने परिशिष्ठ "ब" मध्ये दिलेल्या नमुन्यात १ महिन्याचे आत लिव्ह अॅण्ड लायसन्सी/ परवाना पत्र करावा लागणार आहे. त्याशिवाय दुकान गाळे/ऑफिसयांचा ताबा दिला जाणार नाही.

16. मान्य लिलाव धारकांस दुकान भाड्याच्या अटी-शर्ती मान्य असल्याबाबत रितसर लेखी लिव्ह अॅण्ड लायसन्सी/ परवाना पत्र नोंदणीकरीता आवश्यकत्या स्टॅम्प पेपरवर रजिस्टर करुन द्यावा लागेल. तसेच मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम १९५८ नुसार दुकान लिव्ह अॅण्ड लायसन्सी/ परवाना पत्र बाबतचा करारनामा योग्य ते शुल्क भरुन नोंदणीकृत करण्याची जबाबदारी लिलाव धारकांची राहील.

17. दुकान गाळे/ऑफिस करार कालावधीत लिलावधारकाने दुकानाचे काही नुकसान केल्यास होणाऱ्या नुकसानाची रक्कम दंडासह लिलाव धारकांकडुन वसुल करण्यात येईल.

लिपीक भ.वि.प्र. लेखा अधिकारी व्यवस्थापक कार्यकारी अधिकारी

18. दुकान गाळे/ऑफिसमध्ये रंगरंगोटी, किरकोळ दुरूस्ती स्वखर्चाने समितीच्या पुर्व परवानगी करणे बंधनकारक आहे, शिवाय दुकानाच्या मुळ आराखड्यात किंवा इतर कोणताही फेरबदल लिलावधारकास करता येणार नाही.
19. दुकान गाळे/ऑफिस करार कालावधीत लिलावधारकाने कोणत्याही परिस्थीतीमध्ये त्या दुकान गाळे/ऑफिसमध्ये पोट भाडेकरू ठेवणे किंवा लिलावधारकाचे वैयक्तिक/संस्था/कंपनी या नावावर असेल तर त्यालाच गाळा मिळेल, नव्याने लिलावधारक संस्था/कंपनी/ भागीदारी संस्था स्थापन करून सदर दुकान गाळ्यांचे हक्क हस्तांतरीत करता येणार नाही. ही बाब सिध्द झाल्यास अशाप्रकारचा गाळा/ऑफिसेस त्वरित रद्द करण्यात येईल व त्याची सुरक्षा रक्कम जप्त केले जाईल व त्यासाठी केणतीही नुकसान भरपाई रक्कम दिली जाणार नाही.  दुकान परस्पर पोट भाड्याने दिल्यास किंवा हस्तांतरीत करता येणार नाही, तसे केल्याचे निदर्शनास आल्यास नमुद दुकान गाळा/ऑफिसेस समितीतर्फे ताब्यात घेण्यात येईल.
20. लिलावधारकास दुकानात, मांस विक्री, मद्य विक्री, हॉटेल, गुटखा, तंबाखु, ज्वालाग्राही किंवा स्फोटक पदार्थ तसेच शासनाने ज्यांच्या विक्रीस बंदी घातली आहे असे व्यवसाय करता येणार नाही.
21. दुकान गाळे/ऑफिसभाडे कालावधीत मुळ लिलावधारक मयत झाल्यास, विभक्त झाल्यास अगर व्यवसायात नविन भागीदार आल्यास त्याबाबतची पुर्व परवानगी कार्यकारी अधिकारी यांचेकडुन घेणे बंधनकारक राहील. तसेच एकच दुकानात एकापेक्षा अधिक व्यक्तीच्या नावे दुकान लिलाव भाग घेणे असल्यास तशी पुर्व सुचना व तदअनुशंगीक दस्तावेज समितीकडे दाखल करणे बंधनकारक राहील.
22. तसेच कोणत्याही कारणाशिवाय कोणतीही लिलाव बोली मंजुर/नामंजुर करण्याचा अधिकार, तसेच अटी व शर्तीमध्ये बदल करणेचे अधिकार कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्याकडेस राखुन ठेवण्यात आलेला आहे.
23. दुकान गाळे/ऑफिसेस यांस कोणत्याही कारणाने नैसर्गीक आपत्ती (आग, भुकंप, पूर व इतर) मुळे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांची राहणार नाही.
24. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस कोणत्याही कारणासाठी संबंधीत गाळ्याची आवश्यकता असल्यास समिती गाळा ताब्यात घेण्यापूर्वी संबधीतास ३ महिन्याची आगाऊ नोटीस देईल, व दुकान गाळे/ ऑफिसेस/हॉल ताब्यात घेईल. अशा वेळी लिलावधारकास कोणतीही नुकसान भरपाई देय असणार नाही.

लिपीक    भ.वि.प्र.    लेखा अधिकारी    व्यवस्थापक    कार्यकारी अधिकारी

25. श्री विठ्ठल रूक्मिणी भक्त निवास संकुलातील दुकान गाळे/ऑफिसधारकांनी घनकचरा व्यवस्थापन २०१६ नुसार ओला व सुका कचऱ्यासाठी स्वतंत्र वर्गीकरण करणे, तसेच तो कचरा कुंडीमध्ये टाकणे, तसेच दुकान गाळे/ऑफिसपरिसर स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहील. दुकानाच्या परिसरामध्ये अस्वच्छता आढळून आल्यास संबंधीताना कायद्यातील तरतुदीप्रमाणे दंड आकारण्यात येईल.
26. श्री विठ्ठल रूक्मिणी भक्त निवास संकुलातील दुकान गाळे/ऑफिसधारकांनी बाहेरील बाजुस साईन बोर्ड, बांधकाम व प्रदर्शन समितीचे ठरवून दिलेल्या जागेत विहीत नमुन्यात करावे लागेल.
27. श्री विठ्ठल रूक्मिणी भक्त निवास संकुलातील दुकान गाळे/ऑफिसेस कार्यालयीन वेळेत पहाणी करीता येतील.
28. ई–लिलावात सहभागी झालेल्या सर्व लिलावधारकांची अंतिम सुरक्षा ठेव बोली निश्चित झालेनंतर पात्र लिलावधारकांच्या दस्तावेजांची छाननी करण्यात येईल व त्यानंतर संबंधितास मान्य सुरक्षा ठेव रक्कम भरणा करणेबाबत कळविण्यात येईल.
29. येणे प्रमाणे अटी–शर्तीत काहीही अंतर्भुत असलेतरी वादग्रस्त स्थितीत समितीच्या मार्गदर्शक सुचना/निर्णय अतिभावी ठरतील व त्या लिलावदारांस बंधनकारक राहतील.
30. लिलावाबाबत अधिक मार्गदर्शनाकरीता ०२०–२५३१५५५५/३०१८७५०० या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

कार्यकारी अधिकारी

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,

पंढरपूर

लिपीक भ.वि.प्र. लेखा अधिकारी व्यवस्थापक कार्यकारी अधिकारी

परिशिष्ठ 'अ'

| श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| नवीन भक्त निवास, सर्वे नंबर ५९, पंढरपूर | | | | | | |
| ई–लिलाव–२०२० दुकान गाळा/ ऑफिसेस ची माहीती | | | | | | |
| अ.क्रं. | तळ मजला | साईज (मीटर) | चटई क्षेत्रफळ (चौ.मीटर) | दरमहा भाडे | सुरक्षा ठेव किमान बोली रक्कम | लिलाव दिनांक |
| १ | एफ विंग – दुकान गाळा क्रं.१० | 5.400 X 3.400 | 18.36 | ४०००/– | २,५०,०००/– | १८/०१/२१ |
| २ | एफ विंग – दुकान गाळा क्रं.१९ | 5.400 X 3.400 | 18.36 | ४०००/– | २,५०,०००/– | १८/०१/२१ |
| ३ | एफ विंग दुकान गाळा क्रं.२०(अपंगाकरीता) | 5.400 X 3.600 | 19.44 | ४०००/– | २,५०,०००/– | १८/०१/२१ |
| ४ | एफ विंग – दुकान गाळा क्रं.२१ | 5.400 X 3.600 | 19.44 | ४०००/– | २,५०,०००/– | १८/०१/२१ |
| ५ | एफ विंग – दुकान गाळा क्रं.२६ | 5.400 X 3.600 | 19.44 | ४०००/– | २,५०,०००/– | १८/०१/२१ |
| ६ | एफ विंग – दुकान गाळा क्रं.२८ | 5.400 X 3.600 | 19.44 | ४०००/– | २,५०,०००/– | १८/०१/२१ |
| ७ | एफ विंग – दुकान गाळा क्रं.२९ | 5.400 X 3.600 | 19.44 | ४०००/– | २,५०,०००/– | १८/०१/२१ |
| ८ | सी विंग दुकान गाळा क्रं.३०(अपंगाकरीता) | 3.400 X 2.725 | 9.27 | ४०००/– | २,५०,०००/– | १८/०१/२१ |
| ९ | सी विंग – दुकान गाळा क्रं.३८ | 3.400 X 3.650 | 12.41 | ४०००/– | २,५०,०००/– | १८/०१/२१ |
| १० | सी विंग – दुकान गाळा क्रं.४३ | 3.400 X 3.125 | 10.63 | ४०००/– | २,५०,०००/– | १८/०१/२१ |
| ११ | एफ विंग पहिला मजला ऑफिस क्र. १ | 5.400 X 7.430 | 40.12 | ८५००/– | ३,००,०००/– | १८/०१/२१ |
| १२ | एफ विंग पहिला मजला ऑफिस क्र. २ | 5.400 X 6.530 | 35.26 | ८५००/– | ३,००,०००/– | १८/०१/२१ |
| १३ | एफ विंग पहिला मजला ऑफिस क्र. ३ | 5.400 X 6.530 | 35.26 | ८५००/– | ३,००,०००/– | १८/०१/२१ |
| १४ | एफ विंग पहिला मजला ऑफिस क्र. ४ | 5.400 X 7.430 | 40.12 | ८५००/– | ३,००,०००/– | १८/०१/२१ |
| १५ | एफ विंग पहिला मजला ऑफिस क्र. ५ | 5.400 X 7.430 | 40.12 | ८५००/– | ३,००,०००/– | १८/०१/२१ |
| १६ | एफ विंग पहिला मजला ऑफिस क्र. ६ | 6.400 X 7.420 | 47.49 | ८५००/– | ३,००,०००/– | १८/०१/२१ |
| १७ | एफ विंग पहिला मजला ऑफिस क्र. ७ | 5.050 X 5.520 | 27.88 | ८५००/– | ३,००,०००/– | १८/०१/२१ |
| १८ | एफ विंग पहिला मजला ऑफिस क्र. ८ | 5.050 X 5.520 | 27.88 | ८५००/– | ३,००,०००/– | १८/०१/२१ |
| १९ | एफ विंग पहिला मजला ऑफिस क्र. ११ | 3.770 X 5.050 | 19.04 | ८५००/– | ३,००,०००/– | १८/०१/२१ |

लिपीक भ.वि.प्र. लेखा अधिकारी व्यवस्थापक कार्यकारी अधिकारी

परिशिष्ठ 'ब'

## ।। श्री विठ्ठल रूक्मिणी प्रसन्न ।।

## लिव्ह ॲण्ड लायसन्सी / परवाना पत्र

लिव्ह ॲण्ड लायसन्सी / परवाना पत्र आज दिनांक /०१/२०२१ वार ------- माहे ------ सन २०२१ वार ------ इसवी ते रोजीचे...

---

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,

पंढरपूर लिहुण घेणार

तर्फे कार्यकारी अधिकारी

श्री. ---------------

वय - ---- वर्षे, धंदा - ------ लिहुण देणार

रा.- -------------------

कारणे लिव्ह ॲण्ड लायसन्सी / परवाना पत्र लिहुन देतो की,-

१) मिळकतीचे वर्णन :- डि. सोलापूर सब डि. व तालुका पंढरपूर, मे. सब रजिस्ट्रार साहेब यांचे हद्दीतील व पंढरपूर नगरपालिका यांचे स्थळसिमेतील सि.स. नं. ५९ या मिळकतीवर बांधलेल्या श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास संकुलातील, या इमारतीतील -----विंग मधील -----मजल्यावरील दुकान गाळा क्र./ऑफिस क्र. ----- यांसी क्षेत्र ------- चौरस फुट येणेप्रमाणे मिळकत त्यामधील फिटींग्ज व फर्निचरसह इतर सर्व सुविधांसह ज्याचा उल्लेख या पुढे सदरची मिळकत करारनाम्याचा विषय आहे.

२) लिहून घेणार पंढरपूर मंदिरे अधिनियम-१९७३ ही महाराष्ट्र शासन स्थापित श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती यांचे मालकी हक्काची असून निर्वेध व निजोखमी असून सदर मिळकतीचे हस्तांतरण, भाड्याने देण्याचा

लिपीक भ.वि.प्र. लेखा अधिकारी व्यवस्थापक कार्यकारी अधिकारी

करारनामा करून देणेचे समितीस पुर्ण हक्क व अधिकार आहे. प्रस्तुत हक्कास व अधिकारास अनुसरूनच सदर दुकान/ऑफिस मिळकत वापरणेकामी प्रस्तुतचा करारनामा आज रोजी लिहून देत आहोत.

३) सदर समितीने वर कलम नं १ मध्ये वर्णन केलेले मिळकत ही भाडेतत्वावर देण्यासाठी ई–लिलाव प्रक्रीया राबविली होती. सदर ई–लिलाव प्रक्रियेमध्ये लिहुन देणार यांनी सहभागी झाले. तसेच प्रक्रियेप्रमाणे ई–लिलाव बुकलेटच्या अटी शर्तीस अधिन राहुन सदर दुकान गाळा/ऑफिस करीता उच्च सुरक्षा ठेव बोली बोलुन सदर दुकान गाळा/ऑफिस चे लिलाव धारक झाले आहेत.

४) दुकान गाळ्याचे मासिक भाडे दर हे नगरपालिका कराव्यतिरिक्त आहे. नगरपालिका कर तसेच सेवा कर व इतर अन्य कर (जी.एस.टी.,सरकारी,वीज,पाणी) वगरै असतील ते लिहुण देणार यांनी स्वतंत्रपणे मंदिरे समिती कडे जमा करावयाचे आहे.

५) लिहून देणार यांनी त्यांचे बोली प्रमाणे सुरक्षा ठेव जमा केले नंतर लिहून घेणार हे सदरील मिळकत व्यवसायकरीता वापरास देण्यास तयार झाले आहेत. सदरील व्यवसायिक वापराच्या व्यवहाराचा मोबदला दरमहा “परिशिष्ठ अ” प्रमाणे असुन तिमाही पध्दतीने अगाऊ घेण्याचा ठरविण्यात आले असुन, लिहून देणार यांना मान्य असल्यामुळे त्यांनी सदरील मिळकत लिहून घेणार यांस तिचेवरील व्यवसायिक वापराच्या हक्कांसह खालील अटी, शर्तीत नमूद केल्याप्रमाणे मान्य व कबुल करून प्रस्तुतचा दस्त मोबदला स्विकारून लिहून दिलेला आहे.

सदरील लिहून घेणार व लिहून देणार यांच्या दरम्यान ठरलेल्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :–

ए) सदर करारनाम्याची मुदत ३३ महीन्याचे म्हणजेच दिनांक ०१/०२/२०२१ ते ३१/१०/२०२३ इतकी आहे व राहील. वर कलम १ यामध्ये वर्णन केलेली मिळकत ही दि.०१/०२/२०२१ लिहुण घेणारानी लिहुन देणारास व्यवसाय करणेस ताब्यात दिली आहे.

बी) लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना व्यवसायिक वापराच्या व्यवहाराचा मोबदला दरमहा रूपये-------–/– ( अक्षरी रूपये -------- फक्त) देण्याचा आहे. सदरील व्यवसायिक वापराच्यापोटी मोबदला लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना तीन महिन्याचे अगाऊ भाडे द्यावयाचे आहे. तसेच ई–लिलाव बुकलेट मधील अटी शर्ती क्र. १३ प्रमाणे आपले भाडेवाढ होईल. ती पुढील प्रमाणे असेल.

लिपीक    भ.वि.प्र.    लेखा अधिकारी    व्यवस्थापक    कार्यकारी अधिकारी

| अ.क्र. | बोली प्रमाणे प्रति माह भाडे | वार्षीक भाडे एकुण | | भाडे वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | माहे फेब्रुवारी २०२१ | फेब्रुवारी २०२१ ते डिसेंबर २०२१ | | प्रथम ११ महिने परिशिष्ठ अ प्रमाणे |
| २ | माहे जानेवारी २०२२ | जानेवारी २०२२ ते नोव्हेंबर २०२२ | | द्वितीय ११ महिने ०५% वाढ प्रमाणे प्रथम ११ महिन्याचे भाड्यावरती |
| ३ | माहे नोव्हेंबर २०२२ | नोव्हेंबर २०२२ ते ऑक्टोंबर २०२३ | | तृतीय ११ महीने १०% भाडेवाढ द्वितीय ११ महिन्याचे भाड्यावरती |

सदरील व्यवसायिक वापराच्या व्यवहाराचा मोबदलाचा महीना प्रत्येक इंग्रजी कॅलेंडर प्रमाणे दर महिन्याच्या १ तारखेस सुरू होवुन त्याच महीन्याच्या अखेरच्या तारखेस संपेल. तसेच लिहुन देणार यांनी दर ३ महिन्याचे सुरवातीचे १५ दिवसाचे आत अगाऊ ३ महिन्याचे भाडे जमा करणे ही ह्या कराराची मुख्य अट व शर्त आहे. सदर अटीचा भंग झाल्यास प्रस्तुतचा करारनामा संपुष्ठात येईल. त्याबाबत लिहुन देणार यांची कोणत्याही प्रकारची तक्रार चालणर नाही. प्रस्तुत अटीस लिहुन देणार हे बांधील आहेत. याकरीता वेगळे बंध/हमीपत्राची गरज नाही.

सी) सदरील मिळकत ही केवळ आणि केवळ व्यवसायिक वापराकरीता दिलेली असुन त्यामध्ये सदर लिलाव धारक वा त्याचे कर्मचारी यांनी त्याचा रहिवासी वापर अथवा इतर अन्य कोणत्याही कारणासाठी वापर करणे नाही.

डी) सदर व्यापारी दुकानाच्या सुरक्षिततेपोटी सुरक्षा ठेव बोली रक्कम रुपये --------/-( अक्षरी -------- -----------फक्त) लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना आज रोजी रोख/डी.डी./चेक स्वरूपात दिलेली असुन त्याचा जमा पावती क्र._______ अन्वये ते लिहुन घेणार यांना मिळाले. सदरची अनामत रक्कम प्रस्तुत करारनाम्याची मुदत संपल्यानंतर व सदर दुकान गाळा ताबा दिल्यानंतर बिनव्याजी लिहुन घेणार परत करतील.

ई) सदर व्यापारी दुकानामध्ये लिहुन देणारचे नावे विद्युत पुरवठा कनेक्शन असुन त्याचा वापर लिहुन घेणार यांनी करावयाचा आहे. त्याचे बील लिहुन देणारांनी भरावयाचे आहे. त्याची कोणत्याही प्रकारे थकबाकी करण्याची नाही.

एफ) असे की, कलम १ मधील मिळकतीमध्ये लिहून देणार कोणत्याही प्रकारचा क्षेत्रफळामध्ये बदल करणार नाही अगर कोणत्याही प्रकारचे पक्या स्वरूपाचे बांधकाम व इमारतीमध्ये असणाऱ्या सद्य स्थितीतील बांधकामामध्ये कोणताही बदल करणार नाही. तसेच सदरील मिळकत चांगली व स्वच्छ ठेवीन मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा

लिपीक भ.वि.प्र. लेखा अधिकारी व्यवस्थापक कार्यकारी अधिकारी

बेकायदेशीर व्यवसाय करणार नाही. तसेच कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन सदरहू मिळकतीत करणार नाहीत तसे अढळल्यास सदर मिळकत रिकामी करून घेण्याचा संपुर्ण अधिकार लिहून घेणार यांचेकडे राहील. तसेच स्फोटक द्रव्य पदार्थ मिळकतीमध्ये ठेवणार नाही.

जी) असे की, सदरील मिळकतीमध्ये काही बदल, तोडफोड दुरूस्ती वा रंगरंगोटी करावयाची असल्यास त्याबाबत लिहून देणार यांनी लिहून घेणार यांच्याकडून पुर्व लेखी सूचना घेतल्यानंतर बदल व दुरूस्ती वा रंगरंगोटी करणेची आहे. लेखी परवानगी शिवाय लिहून देणार यांनी काही बदल करणेचा नाही.

एच) असे की, भारतातील कोणत्याही भाडे कायद्याअंतर्गत लिहून देणार यांना भाडेकरू म्हणून कधीही हक्क प्राप्त होणार नाही लिहूण देणार लायसेन्सी आणि लिहून घेणार लायसेन्सॉर असाच संबंध लिहून घेणार व लिहून देणार यांचेमध्ये आहे व राहील.

आय) असे की, वरील सर्व अटींचे व शर्तीचे पालन लिहूण देणार यांनी करणेचे असुन कोणत्याही अटीचे लिहून देणार यांनी उल्लघंन करणेची नाही सदर अटी व शर्तीचे पालन लिहून देणार यांनी न केल्यास जागेचा ताबा मागणेचा अधिकार व परवानापत्र कधीही रद्द करण्याचा अधिकार लिहून घेणार यांना राहील.

जे) असे की, सदरील मिळकतीमध्ये स्थापन करण्यात येणाऱ्या व्यवसायाकरिता कोणत्याही व्यक्तीकडून सहकारी बँकाकडून, राष्ट्रीयकृत बँकाकडून कोणत्याही वित्तीय संस्था कडुन कोणत्याही पतसंस्थाकडून, सावकाराकडून व इतर कोणतेही कसल्याही प्रकारचे कर्ज घेण्याचा हक्क व अधिकार लिहून देणारास राहाणार नाही व सदर मिळकतीवर लिहुन देणार सहकारी बँकाकडून, राष्ट्रीयकृत बँकाकडून कोणत्याही वित्तीय संस्था कडुन कोणत्याही पतसंस्थाकडून, सावकाराकडून बोजा चडवून कर्ज घेणार नाही अशी हमी व वचन ह्या द्वारे तुम्हास देत आहे.

के) असे की, सदरील मिळकतीमधील करार कलम १ मध्ये वर्णन केलेल्या जागेशिवाय इतर राहिलेल्या मिळकतीमध्ये या लिव्ह ॲण्ड लायसन्सी/परवाना पत्राचा काही एक संबध नाही.

एल) लिहुण देणार हे घनकचरा व्यवस्थापन २०१६ नुसार ओला व सुका कचऱ्यासाठी स्वतंत्र वर्गीकरण करणे, तसेच तो कचरा कुंडीमध्ये टाकणे, तसेच दुकान गाळा व परिसर स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहील. दुकानाच्या परिसरामध्ये अस्वच्छता आढळून आल्यास संबंधीताना कायद्यातील तरतुदीप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

लिपीक　　भ.वि.प्र.　　लेखा अधिकारी　　व्यवस्थापक　　कार्यकारी अधिकारी

एम) लिहुण देणार यांचे करीता त्यांचे मालकीचे एक वाहन पार्कींगची व्यवस्था लिहूण घेणार यांनी करून दिलेल्या जागेत करावयाची आहे. त्या व्यतीरीक्त इतरत्र जागेत लिहुन देणार यांनी वाहन पार्कींग करू नये.

एन) लिहूण घेणार यांनी शौचालय बांधलेले असुन त्यांचे लिहुण देणार यांनी वापर करून त्या ठिकाणी स्वछता ठेवावी.

ओ) लिहुन देणार यांनी त्यांना वापरावयास दिलेल्या मिळकतीचा वापर चांगला व योग्य स्थितीत करणेचा असुन सदरची मिळकर चांगली व योग्य स्थितीत ठेवण्याची आहे. सदर मिळकतीतील दारे, खिडक्या, लाईट फिटींग काचा यांचा वापर योग्य करून सुस्थितीत ठेवणेचे आहे.

पी) येणे प्रमाणे अटी–शर्तीत काहीही अंतर्भुत असलेतरी वादग्रस्त स्थितीत कार्यकारी अधिकारी व समितीच्या मार्गदर्शक सुचना/निर्णय अतिभावी ठरतील व त्या लिलावदारांस बंधनकारक राहतील

क्यु) लिहून देणार यांनी त्यांचे व्यवसायासाठी केलेले फर्निचर मुदत संपल्यानंतर त्यांचे स्वखर्चाने काढून घेणेचे आहे. त्यास लिहून घेणार यांनी हरकत करणेची नाही.

आर) ई–लिलाव बुकलेट मधील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच त्याचा भंग झाल्यास सदर करारनामा रद्द होईल. व दुकान ताबा लिहुण घेणार यांना देण्यात येईल, त्याबाबत माझी काही तक्रार चालणार नाही.

सबब हे लिव्ह लायसेन्सी/ परवाना पत्र लिहून देणार यांनी स्वत:चे राजीखुशीने, अक्कलहुशारीने, समजुन उमजुन, वाचून, लिहून दिलेली असून, त्यावर साक्षीदारासमक्ष सह्या केलेल्या आहेत.

साक्षीदार : – १.

सही :

नांव:

पत्ता : लिहुन देणार

२

सही :

नांव :

पत्ता लिहुन घेणार

लिपीक भ.वि.प्र. लेखा अधिकारी व्यवस्थापक कार्यकारी अधिकारी